ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २२ एप्रिल, १९५९ | अंक १६

## विविध माहिती

**रशिआनें सर्व माहिती दिली नाहीं**—अमेरिकेच्या अंतरिक्ष प्रवासाविषयींच्या एका तज्ज्ञानें अशी तक्रार केली आहे कीं, रशिअन शास्त्रज्ञांनीं उपग्रहांचे प्रयोग करून जी माहिती मिळविली त्यांपैकीं कांहीं जाहीर केली नाहीं. विशेषतः उपग्रहांच्या कक्षासंबंधींची माहिती गुप्त ठेवण्यांत आली आहे. आंतरराष्ट्रीय भूज्ञान वर्षातील सहकार्याच्या दृष्टीनें गुप्तता योग्य नाहीं, असें त्याचें मत आहे.

**तुतिकोरीनचा शिंपल्यांचा हंगाम**—तुतिकोरीनजवळच्या समुद्रांत मोतीं असणारें शिंपले वर काढण्याचा धंदा चालतो. चालू हंगामांत सुमारें ७५ लाख शिंपले वर काढण्यांत आले. ह्या हंगामांत सरकारला ५,२७,००० रुपये उत्पन्न झालें. हंगामाचा प्रारंभ गेल्या फेब्रुवारीपासून झाला होता.

**विशेष प्रकारचें पोलाद**—कांहीं विशेष प्रकारचें पोलाद तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. कारखान्याचा आराखडा तयार करण्यासाठीं एक फ्रेंच कंपनी व ब्रिटिश कंपनी ह्यांना आवाहन करण्यांत आलें आहे. कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता ४०,००० टनांची राहील. पण नंतर ती वाढवितां येईल.

**शेतीच्या अवजारांचें उत्पादन**—भारतामधील शेतीच्या अवजारांचें उत्पादन घटलें आहे. १९५७ सालीं १५,२२४ टन वजनांचीं अवजारें निर्माण करण्यांत आलीं होतीं. १९५८ सालीं १३,००० टन वजनाचीं अवजारें निर्माण करण्यांत आलीं. अवजारें निर्माण करणाऱ्या कारखान्यांची संख्या ४२ वरून ३८ पर्यंत खाली आली आहे.

**हौशी प्रवाशांची सोय**—भारतांत येणारे परदेशीय प्रवासी अनेक प्रेक्षणीय स्थळांना व शहरांना भेटी देतात. त्या वेळीं ते कांहीं वस्तूहि खरेदी करतात. परंतु वस्तूंच्या किंमतीची त्यांना यथार्थ कल्पना असतेच असें नाहीं. हौशी प्रवाशांची खरेदी करतांना फसवणूक होऊं नये म्हणून भारत सरकारच्या प्रवासविभागानें मान्य दुकानांची एक यादी तयार करण्याचें ठरविलें आहे.

**लहान मुलांसाठी बाग**—लहान मुलांना खेळण्यासाठी उपयुक्त ठरेल अशा प्रकारची एक बाग तयार करण्याचें दिल्ली म्युनिसिपालिटीनें ठरविलें आहे. बागेचा नकाशा तयार झाला असून तो मंजूरहि करण्यांत आला आहे. ह्या योजनेसाठीं नगरपालिकेच्या अंदाजपत्रकांत ५०,००० रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे.

**इंदूर-दोहद रेल्वेमार्ग**—इंदूर शहर हें भारतामधील गिरणीकापडाच्या धंद्यांतील चवथ्या प्रतीचें शहर आहे. परंतु त्या शहराचा मुंबई, अहमदाबाद अगर बडोदा ह्यासारख्या शहरांशीं रुंद रुळांच्या रेल्वेमार्गानें संबंध नाहीं. इंदूर ते दोहद हा १०८ मैलांचा रुंद रुळांचा मार्ग झाला तर ही गैरसोय नाहींशी होईल. मध्यप्रदेश सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या मार्गाची सूचना केली आहे.

**सिनेमाच्या धंद्यांतील नोकर**—सिनेमाच्या धंद्यांत काम करणाऱ्या कामगारांचें किमान वेतन ठरविण्यासाठीं पंजाब सरकारनें एक कमिटी नेमली आहे. पंजाब सरकारचे लेबर कमिशनर कमिटीचे अध्यक्ष राहतील. कमिटींत कामगारांचे व मालकवर्गाचे मिळून नऊ सभासद असतील. दहा जणांच्या ह्या कमिटीनें एप्रिलअखेर अहवाल सादर करावयाचा आहे.

**पंजाब नॅशनल बँकेचा ६४ वा वर्षदिन**—पंजाब बँकेचा ६४ वा वाढदिवस दिल्ली येथें साजरा करण्यांत आला. ही बँक १८९५ सालीं लाहोर येथें स्थापन करण्यांत आली. त्यावेळीं तिचें भाग भांडवल अवघें २०,००० रुपये होतें. आतां बँकेचें खेळतें भांडवल सुमारें १५० कोटींपर्यंत वाढलें असून देशभर पसरलेल्या बँकेच्या शाखांची संख्या ३६५ आहे.

**नेपाळला रशिआची मदत**—रशिआ आणि नेपाळ ह्यांच्या दरम्यान आर्थिक मदतीचा करार करण्यांत आला आहे. करारा-प्रमाणें नेपाळला रशिआकडून ३ ते ४ कोटी रुपये मिळणार आहेत. ह्या रकमेचा उपयोग करून रस्ते-बांधणीसंबंधीं पहाणी करण्यांत येईल. त्याशिवाय खाटमांडूजवळ एक साखरेचा कारखाना व एक वीज-निर्मिति केंद्र बांधण्यांत येणार आहे.

**सरकारी जमिनींची वांटणी**—राजस्थान सरकारनें राज्यांतील जमिनींशिवाय असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अजमावण्याच्या दृष्टीनें पहाणी करावयाचें ठरविलें आहे. ही पहाणी होईपर्यंत सरकारी मालकीच्या जमिनीचें वांटप थांबविण्यांत आलें आहे. ह्यापुढें सरकारच्या मालकीच्या जमिनीचें वांटप भूमिहीन शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांमध्येंच करण्यांत येणार आहे.

**मानसिक अस्वस्थतेचें कारण**—१९४५ सालीं जपानमधील हिरोशिमा व नागासकी ह्या शहरांवर अणुबाँब टाकणाऱ्या हवाईदलांत काम करणाऱ्या एका अमेरिकन वैमानिकाला मानसिक अस्वस्थतेमुळें मानसिक रुग्णांच्या इस्पितळांत दाखल करण्यांत आलें आहे. सदर वैमानिकाची अशी समजूत झाली आहे कीं, कोणीतरी जपानी आपला वध करणार.

## पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट लागू केल्यास सहकारी सोसायटयांची लवादाची योजना रद्द होत नाहीं

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

बगीचा मिल्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी ही अहमदाबाद येथील एक को-ऑपरेटिव्ह सोसायटी असून त्या सोसायटींत नटवरलाल मूळशंकर जोशी हा इसम नोकरी करीत होता. नोकरीवरून काढून टाकण्यांत आल्यामुळें नटवरलालनें पेमेन्ट ऑफ् वेजेस ॲक्टखाली (Payment of Wages Act) नुकसानभरपाईकरितां अर्ज केला. त्यावर को-ऑपरेटिव्ह सोसायटीचें म्हणणें असें होतें कीं, नटवरलालचा अर्ज होऊं शकत नाहीं. त्यानें मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या कायद्याच्या क. ५४ खालीं कारवाई करावयास पाहिजे होती. हें म्हणणें पेमेन्ट ऑफ् वेजेस ॲक्टखालील अधिकाऱ्यानें मान्य केलें नाहीं. यावर केलेल्या अपिलांत डिस्ट्रिक्ट जज्जानें तो निकाल कायम केल्यामुळें को-ऑपरेटिव्ह सोसायटीनें हायकोर्टांत रिव्हिजन-अर्ज केला.

मुंबई गुमास्ता कायद्याच्या (Bombay Shops and Establishments Act, 1948) क. ३८ खालीं काढलेल्या नोटिफिकेशनप्रमाणें पेमेन्ट ऑफ् वेजेस ॲक्ट को-ऑपरेटिव्ह सोसायटयांना लागूं करण्यांत आला आहे हे अर्जदार को-ऑपरेटिव्ह सोसायटीनें मान्य केलें. क. ३८ चा आशय पुढीलप्रमाणें आहे—

"पेमेन्ट ऑफ् वेजेस ॲक्टमध्यें कांहींहि जरी म्हटलेलें असलें तरी राज्य सरकार सरकारी गॅझेटमध्यें नोटिफिकेशन काढून नोटिफिकेशनमध्यें दर्शविलेल्या स्थानिक क्षेत्रांतील संस्थांना आणि नोकरांना पेमेन्ट ऑफ् वेजेस ॲक्ट लागूं करील.

राज्य सरकारनें या कलमाखालीं ता. ३ मार्च १९५५ रोजीं नोटिफिकेशन काढली. ती नोटिफिकेशन अहमदाबादला लागू असल्यामुळें अर्जदार को-ऑपरेटिव्ह सोसायटी पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट या कायद्याच्या कक्षेंत येते याबद्दल वाद नाहीं.

या नोटिफिकेशनचा आधार घेऊन नटवरलालतर्फे पेमेंट ऑफ वेजेस कायद्याखालील अधिकाऱ्यांपुढें आणि डिस्ट्रिक्ट जज्जापुढें असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, क. ३८ मुळें पेमेंट ऑफ वेजेस कायदा अर्जदार को-ऑपरेटिव्ह सोसायटीला लागू झाला म्हणून नुकसानभरपाईकरितां पेमेंट ऑफ वेजेस कायद्याखालील अधिकाऱ्यापुढें नटवरलाल अर्ज करूं शकतो आणि अर्ज ह्याच अधिकाऱ्यापुढें केला पाहिजे.

हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला नाहीं. पेमेंट ऑफ वेजेस कायद्याच्या क. २२ खालीं मजुरी वसूल करण्याकरितां दिवाणी कोर्टांत दावा आणतां येत नाहीं. को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि तिचे नोकर यांच्यांत जर झगडा उत्पन्न झाला तर तो मिटविण्याकरितां मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या कायद्याच्या क. ५४ खालीं लवादाची योजना केलेली आहे. मुंबई गुमास्ता कायद्याच्या क. ३८ खालीं को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांना पेमेंट ऑफ वेजेस कायदा लागू करणारी नोटिफिकेशन काढल्यामुळें मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायटयांच्या कायद्याच्या क. ५४ खालील लवादाची योजना रद्द ठरते किंवा काय हें आपणांस पहावयाचें आहे.

मालक आणि नोकर यांच्यांतील झगडे लवादानें मिटविण्याला पेमेंट ऑफ वेजेस कायदा प्रतिबंध करीत नाहीं. त्यांच्यामधील झगड्यासंबंधी दावा आणावयालाच पेमेंट ऑफ वेजेस कायद्यानें प्रतिबंध केलेला आहे. असें असल्यामुळें ता. ३ मार्च १९५५ रोजीं काढलेल्या नोटिफिकेशनद्वारें पेमेंट ऑफ वेजेस कायदा जरी को-ऑपरेटिव्ह सोसायटयांना लागू करण्यांत आला असला तरी त्यामुळें मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायटयांच्या कायद्याच्या क. ५४ खालील लवादाची योजना रद्द होत नाहीं.

वरीलप्रमाणें निकाल देऊन हायकोर्टानें रिव्हिजन-अर्ज मंजूर केला.

मुंबई गुमास्ता कायद्याच्या (Bombay Shops and Establishments Act) क. ३८ खालीं नोटिफिकेशन काढून को-ऑपरेटिव्ह सोसायटयांना पेमेंट ऑफ वेजेस कायदा जरी लागू करण्यांत आला असला तरी त्या नोटिफिकेशनमुळें मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायटयांच्या कायद्याच्या क. ५४ खालील लवादाची योजना रद्द होत नाहीं. को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि तिचे नोकर यांच्यांत जर झगडा झाला तर नोकरांना क. ५४ खालील कारवाई करतां येते.

---

### वाढत्या महागाईचे बोलके आंकडे
(१९५२–५३ = १००)

| | २९-१२-१९५६ | २७-१२-१९५८ | वाढ (+) घट (–) |
|---|---|---|---|
| खाद्य पदार्थ | १०२·९ | ११२·१ | + ८·९४ |
| धान्यें | ९५-० | १०४·१ | + ९·५८ |
| दारू व तंबाखू | ८८·२ | ९७·८ | +१०·८८ |
| सर्पण, वीज, इ. | १०६·८ | ११५·१ | + ७·७७ |
| औद्योगिक कच्चा माल | ११९·१ | ११२·४ | – ५·६३ |
| तयार माल | १०८·६ | १०८·० | – ०·५५ |
| कपास कापड | ११०·० | ११०·० | — |
| सर्व जिनसा | १०६·० | ११०·७ | + ३·५५ |

---

### मध्यवर्ती सरकारच्या एक्साइज करांचा बोजा
(आंकडे लक्ष रुपयांचे)

| बाब | १९५३–५४ (प्रत्यक्ष) | १९५७–५८ (प्रत्यक्ष) | १९५९–६० (बजेट) |
|---|---|---|---|
| मोटर | २,४७ | ३०,८५ | ३३,२५ |
| केरोसीन | ३३ | ३,०६ | ५,०८ |
| साखर | १४,३६ | ४२,७५ | ४६,०० |
| आगपेट्या | ९,३२ | १५,०८ | १८,०० |
| तंबाखू | ३३,०० | ४५,४९ | ४१,९९ |
| वनस्पती | २,७९ | ३,९२ | ३,९३ |
| चहा | २,०९ | ३,८६ | ६,८० |
| कपास कापड | २१,६७ | ६४,६० | ४२,६६ |
| कृत्रिम रेशीम | ११ | १,६९ | ८० |
| सिमेंट | १० | ११,१७ | १४,०३ |
| पादत्राणें | ८ | ९७ | १,०५ |
| साबण | १६ | १,७३ | १,८५ |
| कागद | २१ | ५,३९ | ६,८० |

# अर्थ

बुधवार, ता. २२ एप्रिल, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### उत्तर प्रदेशांतील साखरेचा धंदा बसत चालला

इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या उत्तर प्रदेश शाखेची ५ वी वार्षिक सभा लखनौ येथें भरली होती. सभेचे अध्यक्ष श्री. श्यामप्रसाद कनोरजा आपल्या भाषणांत म्हणाले कीं उत्तर प्रदेशांतील साखरेच्या कारखान्यांची पिछेहाट होत आहे. १९५२–५३ सालीं भारतांत जितकी साखर पैदा करण्यांत आली त्यापैकीं ७५ टक्के साखर उत्तरप्रदेश व बिहार ह्या राज्यांत तयार झाली होती. त्यानंतरच्या वर्षांत हें प्रमाण ७१ टक्के झालें. त्यापैकी ५६ टक्के साखर उत्तर प्रदेशांत तयार झालेली होती. १९५७–५८ सालच्या हंगामांत उत्तर प्रदेशाचा उत्पादनांतील वाटा ४७·७ टक्क्यांपर्यंत खालीं घसरलेला आढळून आला आणि आतां चालू हंगामांत हा वांटा ४४·३ टक्केच असेल असा अंदाज करण्यांत आला आहे. साखरेच्या धंद्याच्या ह्या पिछेहाटीचीं कारणें थोडक्यांत अशीं सांगतां येतील. उसाचा अनिश्चित पुरवठा, गूळ व खंडसारी साखर तयार करण्यासाठी उसाचा वाढता उपयोग, उसावरील करामुळें उसाची चढी किंमत, साखरेचा कमी पडणारा उतारा, आणि धंद्याकडून घेण्यांत येणारे जबर कर. ह्या धंद्याची परिस्थिति सुधारावयाची असेल तर कारखान्यांच्या भागांत यंत्रशक्तीवर चालणाऱ्या चरकांना बंदी करण्यांत आली पाहिजे. कारखान्यांसाठी राखून ठेवलेल्या भागांत चालू असणाऱ्या खंडसारी कारखान्यांचें स्थलांतर करण्यांत आलें पाहिजे. कारखान्याच्या जवळपास अधिक उसाची लागवड करण्यांत आली पाहिजे. त्याचप्रमाणें पाण्याचा पुरवठा अधिक निश्चित करून वाहतुकीची व्यवस्थाहि नीट करण्यांत आली पाहिजे. उसाच्या कारखान्याच्या मालकीच्या जमिनीवर कमाल मर्यादा घालण्यांत येऊं नये. कारखान्यांची जुनी यंत्रसामुग्री बदलून तिच्या जागीं नवी बसविण्यासाठी सवलती देण्यांत याव्यात आणि साखरेच्या किंमतीची योग्य पातळी ठरविण्यांत यावी.

---

### अधिक मदत करण्याचें रशिआला आवाहन

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक व सामाजिक कौन्सिलचें २७ वें अधिवेशन मेक्सिको सिटी येथें भरलें होतें. ह्या अधिवेशनांत भाषण करतांना रशिअन प्रतिनिधीनें रशिआच्या आर्थिक प्रगतीची वाहवा केली आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर कडक टीका केली. रशिअन प्रतिनिधीच्या भाषणानंतर अमेरिकन प्रतिनिधी मि. फिलिप्स म्हणाले कीं, ज्या देशांची आर्थिक प्रगति खुंटलेली आहे त्यांना मदत करण्याची भाषा रशिआ नेहमींच बोलतो. पण, त्या मानानें त्याची कृति असत नाहीं; म्हणून रशिआनें आपल्या बोलण्याप्रमाणें कृति करून दाखवावी. अविकसित देशांच्या आर्थिक भरभराटीसाठी अमेरिका दोन प्रकारानें मदत करीत आहे. कारण, अशी मदत दिल्याशिवाय त्या देशांची आर्थिक स्थिति सुधारणार नाहीं. पहिला प्रकार म्हणजे तांत्रिक साह्याचा. अलीकडे अमेरिकेनें तांत्रिक साह्य देण्याच्या कार्यक्रमाचा आणखी विस्तार केला आहे. दुसरा प्रकार म्हणजे विकासासाठी जागतिक बँक व इंटर नॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्यांच्या द्वारां निधि पुरविणें. रशिआ आपल्या आर्थिक प्रगतीविषयीं मोठ्या आवाजानें बोलतो. पण वरील दोन्ही प्रकारच्या साह्याची वेळ आली म्हणजे मात्र त्याचा आवाज लहान होतो. रशिआच्या मानानें स्वीडन हा देश लहान आहे, पण रशिआपेक्षा ५० टक्के अधिक मदत अविकसित देशांना देत आहे. कॅनडाची मदत रशिआ देत असलेल्या मदतीच्या दुप्पट आहे. अमेरिकेची मदत तर रशिआच्या मदतीपेक्षा १४ पट अधिक आहे. अविकसित देशांना मदत करण्याचा एक प्रकारचा सहकारी कार्यक्रम संयुक्तराष्ट्र संघटनेनें स्वीकारला आहे. ह्या सहकार्यांत रशिआनें आपल्या आर्थिक ताकदीच्या प्रमाणांत वांटा उचलणें जरूरीचें आहे. खरी जरूरी अधिक साधनसामुग्रीची आहे म्हणून ती अधिक उपलब्ध करून देणें महत्त्वाचें आहे.

---

### जागतिक बँकेचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक

मुंबई सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे चिटणीस श्री. बर्वे कोयना योजनेसाठी मदत मिळविण्यासाठी अमेरिकेला गेले होते. मुंबई येथें कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनपुढें बोलतांना त्यांनीं कोयना योजनेप्रमाणेंच इतर कांहीं विषयांसंबंधी आपले विचार व्यक्त केले. त्यांच्या भाषणाचा विषय 'जागतिक बँक आणि आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय मदत मिळण्यास वाव' असा होता. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, कोयना योजनेला बँकेची मदत मिळाली ह्याचा अर्थ भारताच्या पंचवार्षिक योजना विश्वासार्ह आहेत असाच होतो. कोयना योजनेला मदत देतांना बँकेनें फार सवलती दिल्या आहेत. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतहि बँक अशीच आस्था दाखवील असा भरंवसा धरण्यास हरकत नाहीं. जागतिक बँकेकडून कर्जें मिळविण्यांत भारताचा क्रमांक पहिला लागतो. बँकेनें आतांपर्यंत ५० देशांना विकास कर्जें दिलेलीं आहेत. बँकेचें सर्वांत मोठें व पहिल्या क्रमांकाचे गिऱ्हाईक म्हणून भारतानें मान्यता मिळविली आहे. त्याचाच अर्थ असा आहे कीं भारताची आर्थिक व द्रव्यविषयक परिस्थिति चांगल्या पतीची आहे. जागतिक बँकेच्या कठीण कसोट्यांना उतरतील अशा सर्वांत अधिक योजना भारतानेंच सादर केलेल्या आहेत. ह्या कसोट्यांतून पार पडणाऱ्या योजना भारताच्या पतीच्या द्योतकच म्हणाव्या लागतील. तथापि, बँकेकडून अधिक प्रमाणांत मदत मिळविण्याचें काम अधिकाधिक अवघड होत जाण्याचा संभव आहे. कारण, इतर अविकसित देशांकडून कर्जें मिळविण्याचे प्रयत्न वाढत आहेत. त्यामुळें भारताला स्पर्धेला तोंड द्यावें लागेल असें दिसत आहे. म्हणून भारताचा आर्थिक विकास मुख्यतः देशांतील साधनसामुग्रीवर व निष्ठेवरच अवलंबून राहील.

---

## भारताला अमेरिकेचें आर्थिक साहाय्य

( १५ ऑगस्ट, १९४७ पासून आतांपर्यंत )

| | | लक्ष डॉलर |
|---|---|---|
| (अ) अमेरिकन सरकारचें साहाय्य : | | |
| (१) इंडो-अमेरिकन टेक्निकल को-ऑपरेशन प्रोग्रॅमखालील मदत | | ४२०५ |
| (२) पी. एल. ४८० खालीं शेतीचा माल | | ५४७५ |
| (अ) २९ ऑगस्ट, १९५६ चा करार | २८८१ | |
| (ब) २३ जून, १९५८ चा करार | ४९३ | |
| (क) २६ सप्टेंबर १९५८ चा करार | २१०१ | |
| (३) डेव्हलपमेंट लोन फंड | | १७५० |
| (अ) २३ जून १९५८ चा करार | ७५० | |
| (ब) २४ डिसेंबर १९५८ चा करार | १००० | |
| (४) एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेचें कर्ज | | १५१९ |
| (अ) १९५८ चा करार | १५०० | |
| (ब) खाजगी हिंदी फर्मला कर्ज | १९ | |
| (५) १९५१ चें व्हीट लोन | | १८९७ |
| (६) इतर | | ११९९ |
| (अ) खाजगी संस्थांनीं दिलेला शेत-माल | ७७८ | |
| (ब) ओरिसा लोखंड उपक्रमास मदत, जून १९५८ | २०० | |
| (क) १९५०-५१ मधील मिलोची देणगी | १२२ | |
| (ड) पूर व इतर आपत्तींचें निवारण | ५९ | |
| (इ) इतर देशांचें चलन दिलें. | ४० | |
| एकूण | | १६०४५ |

(वरीलपैकी २४१६ लक्ष डॉलर्सचें कर्ज डॉलर्समध्यें परत फेडावयाचें असून ७८२७ लक्ष डॉलर्सचें कर्ज रुपयांत अथवा डॉलर्समध्यें फेडावयाचें आहे. ४८०२ लक्ष डॉलर्सची देणगी आहे.)

| | | |
|---|---|---|
| (ब) खासगी संस्थांकडून मदत : | | |
| (७) फोर्ड फौंडेशनच्या ग्रँटस | | २७९ |
| (८) रॉकफेलर ग्रँट्स | | ६० |
| (९) इंडो-अमेरिकन कराराखालीं खासगी मदत | | ५५ |
| (१०) रेड क्रॉसची मदत | | ८ |
| (११) अमेरिकन शिक्षण संस्था, धार्मिक संस्था, ह्यांच्या मदतीची अंदाजी रक्कम (रोख अथवा शिष्यवृत्त्या स्वरूपांत) | | ५०० |
| | | ९०२ |
| एकूण | | १६९४७ |

वरील आंकड्यांत युनायटेड नेशन्सच्या मदतीमधील अमेरिकन हिश्श्याचा अंतर्भाव केलेला नाहीं. पण त्यांत अमेरिकेचा हिस्सा सर्वांत मोठा आहे.


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखकः—श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


## अमेरिकन कर्जे व मदत ह्यांची वर्गवारी

| स्वरूप | डॉलर्समध्यें परतफेडीचीं कर्जे | डॉलर्स किंवा रुपये यांत परतफेडीचीं कर्जे | देणग्या |
|---|---|---|---|
| | ( आंकडे | लक्ष डॉलर्स | चें ) |
| तांत्रिक मदत व आर्थिक मदत | | १३० | २९०५ |
| एशिअन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट फंड | | २०० | |
| डेव्हलपमेंट लोन फंड | | १७५० | |
| पी. एल. ४८० | | | |
| (अ) ऑगस्ट १९५८ | | २३४१ | ५४० |
| (ब) जून १९५८ | | ४९३ | |
| (क) सप्टेंबर | | १७४३ | ३५८ |
| व्हीटलोन | १८९७ | | |
| एक्सपोर्ट इंपोर्ट बँक | १५१९ | | |
| पूरनिवारण | | | ५९ |
| खासगी संस्थांमार्फत मालाचें वांटप | | | ७७८ |
| इतर देशांचें चलन | | | ४० |
| मिलो | | | १२२ |
| | २४१६ | ७८२७ | ४८०२ |

### आशिआंतील लोकसंख्येचा प्रश्न

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आशिआ व अतिपूर्व भागाच्या आर्थिक समितीनें आशिआंतील लोकसंख्येच्या प्रश्नासंबंधीं एक अहवाल तयार केला आहे. आशिआंतील बहुतेक देशांतून लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीमुळें आर्थिक विकासाला अडथळा येत आहे, असा निष्कर्ष अहवालांत काढण्यांत आला आहे. अहवालांत पुढें असें म्हटलें आहे की, लोकसंख्येच्या वाढीमुळें कुटुंबनियोजनाच्या उपायांकडे प्रामुख्यानें लक्ष द्यावें लागत आहे. कुटुंबनियोजनांत दोन प्रश्न निगडित झालेले आहेत. पहिली गोष्ट म्हणजे निरक्षर लोकांत कुटुंबनियोजनाची गरज तीव्रतेनें वाढेल अशी परिस्थिति निर्माण करणें आणि दुसरी म्हणजे छोट्या कुटुंबासाठी वांटणारी इच्छा ही प्रत्यक्ष मूर्त स्वरूपांत उतरविणें. ह्या दोन्ही दृष्टींनीं पाहतां सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणणें अतिशय महत्त्वाचें ठरतें. आशिया व अतिपूर्व भागांत आज १५० कोटी लोकांची वस्ती आहे. म्हणजे जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोकसंख्या ह्या भागांत आहे. गेल्या कांहीं वर्षांत ह्या भागांतील लोकसंख्या तीव्र वेगानें वाढत आहे. सुमारें १० वर्षांच्या कालांतील लोकसंख्येच्या वाढीचा हा वेग दरसाल २·१ टक्का होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. म्हणजे ह्या कालांत ह्या भागांतील लोकसंख्येंत ५ कोटींची भर पडणार आहे. लोकसंख्येंतील वाढीचा एक विशेष म्हणजे नव्यानें जन्माला येणाऱ्या मुलांपैकी बऱ्याच जणांना पोसणें आर्थिक दृष्ट्या त्या त्या देशांना अशक्यच झालेलें आहे. आशिया खंडांत वयांत आलेल्या प्रत्येक दोन माणसांमागें दोन मुलें असें प्रमाण आहे तर पश्चिम युरोपमध्यें वयांत आलेल्या प्रत्येक तीन माणसांमागें एक मूल असें प्रमाण आहे. सर्वच देशांतून विकासासाठी लागणारें भांडवल अपुरें आढळून आलें.

## भोर स्टेट बँक लिमिटेडची वार्षिक सभा

### चेअरमन, श्री. म. व्यं. शिंगरे, ह्यांनीं घेतलेला आढावा

[ दिनांक ३० मार्च १९५९ इ. रोजीं सोमवारीं दु. १ वाजतां भोर येथें बँकेच्या रजिस्टर्ड कचेरीमध्यें भरणाऱ्या भागीदारांच्या सर्वसाधारण वार्षिक सभेसाठीं संचालकमंडळाचे वतीनें अध्यक्ष मा. म. व्यं. शिंगरे, यांनीं केलेलें भाषण. ]

उपस्थित सभासदबंधूंनो, आपले बँकेच्या संचालकमंडळाचे वतीनें बँकेच्या सन १९५८ अखेरचा वार्षिक अहवाल व हिशेबतपासनीस यांनीं तपासलेला ताळेबंद, नफातोटापत्रक व हिशेबतपासनिसांचा रिपोर्ट आपले मंजुरीसाठी मी आपणांपुढें मांडीत आहें.

#### तुलनात्मक आंकडे

बँकेचा व्यवहार थोडक्यांत समजणें सुलभ व्हावें या हेतूनें सन १९५३ ते १९५८ ह्या सहा वर्षांखेरीचे कांहीं महत्त्वाचे आंकडे तुलतेसाठीं आपलेपुढें मांडीत आहें. यावरून आपले असें निदर्शनास येईल कीं, एकूण ठेवी गेल्या वर्षीपेक्षा ८५,०००/– नें वाढल्या असून सन १९४९ पासून ठेवींमध्यें सतत वाढ होत राहिली आहें. यावरून बँकेवरील जनतेचा विश्वास दिसून येत आहे.

#### तारणी कर्जें व कॅश क्रेडिटस

कर्जें मंजूर करतांना शक्य तों तारणी कर्जें मंजूर करणें व बिनतारणी कर्जें फक्त कॅशक्रेडिट खातेदारानांच कीं ज्यांनीं त्यांचीं खातीं नियमाप्रमाणें मुदतींत पूर्ण केलीं त्यांना पूर्वींइतकीच दरवर्षी कॅशक्रेडिट्स मंजूर करण्याकडे संचालकमंडळाचें धोरण आहे. तसेंच बिनतारणी कर्जें नव्यानें मंजूर शक्यतों न करण्याचें कटाक्षानें ठरविलें आहे. कारण बिनतारणी कर्जांचें प्रमाण अधिक कमी करावें असें रिझर्व्ह बँकेनें सुचविलें. यामुळें एकूण कर्जामध्यें तारणी कर्जांचें प्रमाण वाढत राहील.

बँकेचें खेळतें भांडवल १९५४ सालापासून हळुहळू वाढत आहे. गेल्या वर्षी तें रु. ६०,००० नें वाढलेलें दिसतें.

तारणी कर्जें व कॅशक्रेडिट तुलनात्मक आंकडे पुढीलप्रमाणें.

| सन | एकूण कर्जें | पैकीं तारणी कर्जें | शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| १९५४ | ६,०६,९०० | ३,६८,००० | ६०.६३ |
| १९५५ | ५,९०,९०० | ३,८९,००० | ६५.८३ |
| १९५६ | ६,२६,८०० | ३,९१,००० | ६२.३८ |
| १९५७ | ६,९२,३०० | ४,६७,१४५ | ६७.४७ |
| १९५८ | ६,४६,९०० | ४,३६,००० | ६७.९२ |

सन १९५८ या सालीं नफा रु. ४,८२१ इतका झाला आहे. नफा वाढावा याद्दष्टीनें शक्यते प्रयत्न चालू आहेत.

#### कर्जवसुलीचे कसून प्रयत्न

आपली बँक स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन करून घेणेबाबत पत्रव्यवहार चालू आहे व त्याप्रमाणें त्या बँकेनें आपले बँकेची इन्स्पेक्शनहि केली असून त्याचा रिपोर्टहि त्यांनीं दिला आहे. त्या वेळचे परिस्थितींत समाधानकारक प्रगति दिसावी म्हणून त्या रिपोर्टास अनुसरूनच आपले बँकेनें गेलीं दोन वर्षे धंदा न वाढवितां येणे बाकी वसुली करणेकरितां जास्तींत जास्त प्रयत्न केले व चालू आहेत. म्हणून या वर्षी नफ्याचें प्रमाण कमी कमी होत आहे.

त्याचप्रमाणें १९४६ चा कंपनी कायदा तसेंच पूर्वीपासून लागू असलेले रिझर्व्ह बँकेचें नियंत्रण हे सर्व सांभाळून व अत्यंत काटकसरीनें खर्च करून शक्य तितका नफा वाढविणेचें धोरण संचालक मंडळानें स्वीकारलेलें आहे. जुनीं कॅशक्रेडिट्स व कर्जें यांतील वसुलीचे कायदेशीर प्रयत्न सुरू आहेत; व त्याप्रमाणें रकमा वसूल होत आहेत. जास्तींत जास्त रकम वसूल होणेचे दृष्टीनें उपाययोजना संचालक मंडळ व बँकेचे अधिकारी कायदेशीर सल्लागार मा. पारखी वकील यांचे सल्ल्यानें करीत आहेत. याबाबत वसुली कसकशी होत आहे हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

( आंकडे हजारांत दर्शविले आहेत )

| | येणे बाकी ३१।१२।५५ | येणे बाकी ३१।१२।५८ | एकूण केलेली आजपर्यंत वसूल |
|---|---|---|---|
| (अ) १९५३ पूर्वींचीं जुनीं बिनतारणी खातीं | ६३.०० | ४२.९५ | २०.०५ |
| (ब) 'undesirable nature' म्हणजे ज्यांचीं खातीं शक्य तितके लवकर बंद होणें जरूर आहे अशीं. | ७८.१४ | ३५.८२ | ४२.३२ |
| (क) नव्यानें ज्यांचेविरुद्ध कायदेशीर वसुलीकरितां इलाज केले जात आहेत अशीं | ५३.२२ | २७.४५ | २५.७७ |
| | १९४.३६ | १०६.२२ | ८८.१४ |

#### स्टेट बँकेशीं वाटाघाटी

मागील वर्षाचे रिपोर्टाचे वेळीं सांगितलेप्रमाणें स्टेट बँक ऑफ इंडियाकडील आपले 'बँकेबाबतच्या विलीनीकरणयोजनेवर त्या

| सन | एकूण ठेवी | कर्जें | नफा | खेळतें भांडवल | व्याज | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दिलेलें | मिळालेलें |
| १९५३ | ११,८९,६०० | ७,६४,३०० | ६०३ | १८,९०,९०० | २९,६३६ | ७१,६७८ |
| १९५४ | १२,१०,६०० | ६,०६,९०० | ९,७९७ | १७,१२,१०० | २७,०९७ | ६९,९४० |
| १९५५ | १२,८०,९०० | ५,९०,९०० | ५,६१५ | १७,२७,२०० | २९,५७७ | ६५,३८९ |
| १९५६ | १३,७६,७०० | ६,२६,८०० | ४,४५३ | १७,७८,८०० | २९,९०१ | ६५,१२५ |
| १९५७ | १३,४६,९०० | ६,९२,३०० | ७,९०५ | १७,८०,५०० | ४२,५६९ | ८२,६५९ |
| १९५८ | १४,३१,८०० | ६,४६,९०० | ४,८२१ | १८,४६,००० | ४४,८२७ | ८२,१५४ |

बँकेच्या अधिकाऱ्यांची मुंबई येथें जुलै १९५८ मध्यें समक्ष मुलाखत आपले संचालकमंडळानें घेतली असून भागीदारांचे हिताचे दृष्टीनें विलीनीकरणाबाबत त्या बँकेशीं अद्याप वाटाघाटी चालू आहेत व निश्चित योजना झाल्यावर भागीदारांना याबाबत कळविणेंत येईल.

भोर येथील सेफ डिपॉझिट लॉकरचा स्थानिक खातेदार उपयोग करून घेत आहेत. त्याप्रमाणें बँकेचे इमारतीमध्यें असलेल्या कोठाराचे व्यवस्थेचा शक्य तो फायदा व्यापारी-वर्गानें मालाचे तारणावर कर्जे घेण्यासाठी करावा असें पुन्हां सुचवीत आहे.

सन १९५८ ह्या सालीं नोव्हेंबरमध्यें बँकेचे तपासणीसाठी रिझर्व्ह बँकेकडील बँकिंग ऑफिसर आले होते. त्यांचेकडील रिपोर्ट बँकेकडे आलेला असून त्यामध्यें सुचविलेप्रमाणें बिनतारणी कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण कमी करण्याचें धोरण अमलांत आणिलें आहे. तसेंच दरवर्षी आपले बँकेनें कांहीं कर्जे व कॅशक्रेडिटस संशयित व बुडित दाखविलीं आहेत, त्या रकमेमध्येंहि आपणांस ताळेबंदावरून प्रगति दिसून येईल. गेल्या वर्षीसुद्धां या रकमेपैकी बरीच मोठी रक्कम वसूल केली असून त्याचें प्रमाण पुष्कळच कमी होत आहे.

## कृतज्ञता व आभारप्रदर्शन

सन १९५८ सालीं ऑगस्टमध्यें आपले बँकेचे भोर येथील सल्लागार मंडळाचे अध्यक्ष श्री. ल. मा. देवी हे निधन पावले. त्यांनीं सल्लागारमंडळावर असतांना बँकेचे हितासाठीं जें अमोल मार्गदर्शन केलें आहे, याबाबत बँक त्यांचे उपकार कधींहि विसरूं शकणार नाहीं. त्यांचे निधनामुळें बँकेस एका माहितगार स्थानिक सल्लागारास मुकावें लागलें. तसेंच आपले बँकेचे पहिले अध्यक्ष रावसाहेब विनायक गोविंद रानडे बी. ए. एलएल. बी. हे भोर येथें दि. २२।१२।५८ रोजीं स्वर्गवासी झाले, याचाहि उल्लेख केल्यावांचून रहावत नाहीं.

या वर्षी संचालकमंडळानें जें वेळोवेळीं साहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें भोर, पाली व शिरवळ येथील सल्लागारमंडळांचे सभासदांनीं जें वेळोवेळीं संचालकमंडळास मार्गदर्शन केलें त्याबाबत त्या सर्वांचा मी व संचालकमंडळ आभारी आहे. श्री. वाय. डी. खोले हे जरी दैनंदिन व्यवहारावर पूर्वीप्रमाणें मार्गदर्शन करूं शकले नाहींत तरी स्टेट बँक ऑफ इंडियाकडील विलीनीकरणा-सारखे महत्त्वाचे बाबतींतहि अत्यंत कष्ट सोसून जो सल्ला व मार्गदर्शन ते करीत आहेत त्याबद्दल संचालकमंडळ व मी त्यांचा अतिशय आभारी आहे.

तसेंच आपले बँकेचे कायदेशीर सल्लागार श्री. जी. पी. पारखी, ॲड्व्होकेट, यांनीं वेळोवेळीं जें कायदेशीर मार्गदर्शन केलें त्यांचाहि मी व संचालकमंडळ आभारी आहे.

तसेंच बँकेचे भागीदार, खातेदार, व स्थानिक ठिकठिकाणचे अधिकारी व नोकरवर्ग यांनीं जें साहाय्य केलें त्याविषयीं संचालक मंडळ त्यांचे फार आभारी आहे.

## कारखान्यांच्या उत्पादनांतील मजुरीचा वाटा

भारतांतील मोठ्या कारखान्यांतून उत्पन्न होणाऱ्या मालाच्या किंमतींपैकी सुमारें ४०% रक्कम कामगारांत वाटली जाते. इतर देशांतील तत्सम प्रमाणाशीं तुलना केली तर हें प्रमाण त्याला धरूनच आहे, असें आढळतें.

कारखान्यांच्या उत्पादनाच्या किंमतीमधील कामगारांचा हिस्सा

(आकडे कोटी रुपयांचे)

| | १९४८ | १९५१ | १९५३ |
|---|---|---|---|
| चालू बाजारभावानें | | | |
| उत्पादनाची किंमत | ५२९ | ६१२ | ७३१ |
| कामगारांचें वेतन | १९० | २४५ | २९२ |
| वेतनाचें उत्पादनाच्या | | | |
| किंमतीशीं प्रमाण % | ३५·८ | ४०·१ | ४०·० |

वरील आंकड्यांत रेल्वे वर्कशॉप्स, ऑर्डिनन्स कारखाने, टांकसाळी, नीळ, चहाचे मळे, कॉफी, टेलिग्राफ्स, इत्यादींच्या बाबत समावेश केलेला नाहीं. दरमहा २०० रुपयांपेक्षा कमी प्राप्तीच्या कामगारांचाच येथें विचार केलेला आहे. कामगारांच्या वेतनाची एकूण रक्कम सालोसाल वाढत आहे, पण त्या मानानें उत्पादन मात्र सुधारत नाहीं, असें दिसतें.

कारखान्यांच्या उत्पादनाच्या किंमतींतील कामगारांचा वाटा (%)

(२९ प्रमुख उद्योगधंदे)


| | १९४८ | १९५१ | १९५३ |
|---|---|---|---|
| सबंध भारत | ४२·४३ | ४५·१४ | ५०·६४ |
| आसाम | ३०·३४ | ५६·४४ | ५३ ४५ |
| बिहार | ४१·३२ | ४४·८१ | ४१·६० |
| मुंबई | ४४·५२ | ४७·२४ | ५९·०५ |
| मध्यप्रदेश | ४७·८३ | ५३·२३ | ५४·६० |
| मद्रास | ३९·४२ | ४२·३२ | ४७·९६ |
| ओरिसा | ४१·८१ | ३२·८९ | २९·०९ |
| पंजाब | ४३·३५ | ४१·०२ | ४५·१३ |
| उत्तर प्रदेश | ३८·५६ | ४४·३२ | ४८·०६ |
| प. बंगाल | ४८·३९ | ४४·४२ | ४९·४३ |
| दिल्ली | ३७·४१ | ४२·१६ | ४७·०५ |

कांहीं निवडक कारखान्यांच्या उत्पादनाच्या किंमतींतील कामगारांचा वाटा (%)

| | १९४८ | १९५१ | १९५३ |
|---|---|---|---|
| साखर | २६·९६ | २९·८१ | २८·७३ |
| कागद | ३९·११ | ३०·१३ | ३०·२६ |
| ताग | ५५·८६ | ४२·२८ | २९·४७ |
| लोखंड-पोलाद | ३९·७२ | ४६·५६ | ३५·६४ |
| इंजिनिअरिंग | ५०·०७ | ४५·९८ | ५३·०५ |
| सिमेंट | २७·३८ | २६·३१ | २३·३१ |
| कपास कापड | ४६·२२ | ५३·८४ | ६२·४२ |

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


## कोणाला कशाची
## तर कोणाला कशाची



ह्यांना मुलीच्या लग्नाची काळजी...



तर ह्यांना मुलाच्या शिक्षणाची...



अन् ह्यांना उतारवयाची...



ह्यांना बायकामुलांची काळजी...



तर शेटजींना इस्टेटीची काळजी ..!

या सर्वांचा अर्थ एकच. वेळेला पैशाची जरूरी असते. एकदम पैसा उभा करण्यापेक्षां आतांच थोडा हप्ता भरावयास सुरवात करून एका विशिष्ट रकमेबद्दल निश्चित राहतां येते. तुमचा विमा विक्रेता तुम्हांला योग्य अशी विमा योजना समजावून सांगेल.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC/ 4.



## अन्नाचें रहस्य





बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —





## किर्लोस्कर

## अिलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.

सविस्तर माहितीसाठी लिहा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा**

## मॅनेजिंग एजन्सीच्या कमिशनवर संक्रांत

### औद्योगिक लोकशाही स्थापण्याचा मार्ग

व्यापार-उद्योगमंत्री, श्री. लालबहादुर शास्त्री, ह्यांनीं दि. १७ रोजीं लोकसभेंत जाहीर केलें कीं १९६० नंतर चालू राहूं इच्छिणाऱ्या मॅनेजिंग एजन्सींच्या कमाल कमिशनमध्यें सरकार बरीच मोठी कपात करणार आहे. मॅनेजिंग एजंट पूर्वींइतकी सर्वांगीण कामगिरी आतां करीत नाहींत; तेव्हां त्यांचा मोबदला कमी करणें न्यायाचेंच होईल, असें ते म्हणाले. ऑगस्ट, १९६० नंतर चालू राहणाऱ्या मॅनेजिंग एजंटांना मिळावयाचा कमाल मोबदला १०% चा ५% केला जाईल आणि एकूण नफ्याची रक्कम जेथें मोठी असेल तेथें टप्प्याटप्प्यानें कमाल रक्कमहि कमी केली जाईल. "मॅनेजिंग एजन्सीपद्धतीबद्दल सरकारला विशेष प्रेम वाटत नाहीं; एखाद्या कंपनीनें गुंडाळण्याचें ठरविलें, तर त्याचें सरकार स्वागतच करील" असेंहि मंत्री म्हणाले. सरकारच्या ह्या नव्या धोरणामुळें भागदारांना अधिक डिव्हिडंड मिळेल; औद्योगिक लोकशाहीला त्यामुळें मदत होईल' असा विश्वास त्यांनीं प्रकट केला.

## सहकारी शेतीबाबत दक्षतेचा इषारा

### फोर्ड फौंडेशनच्या तज्ज्ञांचा अभिप्राय

फोर्ड फौंडेशनच्या वतीनें १४ अमेरिकन शेतकी तज्ज्ञांनीं भारताचा दौरा नुकताच पुरा केला. त्यांचे नेते, डॉ. शर्मन ई. जॉन्सन हे दिल्ली येथें म्हणाले, कीं सहकारी शेतीचें तत्त्व आकर्षक आहे, पण त्याच्या अंमलबजावणीचे बाबतींत खूपच दक्षता बाळगायला हवी. शेतकऱ्यांना त्याच्या फायद्याप्रमाणें त्याच्या अडचणीहि समजावून सांगितल्या पाहिजेत. जॉइंट फार्मिंगमधील मॅनेजर हा अनुभवी असायला हवा. त्याच्या कृतीविरुद्ध असंतोष निर्माण झाला तर भांडणें होतील. उत्पादनवाढीचें उद्दिष्ट सफल होणार नाहीं. जॉइंट फार्मिंगचा अवलंब केला म्हणून केवळ धान्याचें उत्पादन वाढत नाहीं. रशिआंतसुद्धां कलेक्टिव्ह फार्म्सपेक्षा परसांतील शेतांत अधिक उत्पन्न निघूं शकतें. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत धान्याचें वार्षिक उत्पादन ११ कोटी टनांवर नेण्याचें उद्दिष्ट आहे, त्याच्या साध्यासाठी कसून लागवड करणें हाच उपाय आहे. खतांचा वापर सध्याच्या मानानें नऊ ते दहा पट वाढविला पाहिजे. बांध, ताली, पाणीपुरवठा, ह्यांस अधिक महत्त्व द्यायला हवें.

### चीनची घोडदौड

चीन सरकारनें नुकतीच एक पुस्तिका प्रसिद्ध करून, चीननें १९५८ मध्यें केलेल्या प्रगतीचा आढावा जाहीर केला आहे. १९५८ मध्यें चीनचें औद्योगिक व शेतीचें उत्पादन १००% नें वाढल्याचें त्यांत नमूद आहे. पोलाद, लोखंड, कोळसा, धान्य, कपास, इत्यादींचें उत्पादन तर दुपटीपेक्षा जास्त वाढलें आहे. सुमारें १,००० नव्या कारखान्यांच्या उभारणीचें काम १९५८ मध्यें चालू होतें. पाणीपुरवठ्याच्या बांधासाठी शेतकऱ्यांनीं ५,८०० कोटी घनमीटर माती व दगड वाहिले. चिनी लोकांचें उत्पन्न व क्रयशक्ति ह्यांत वाढ झाली; किंमती कायम राखण्यांत आल्या. शाळेंत जाण्याजोग्या वयाच्या मुलांमुलींपैकीं ८५% शालेय शिक्षण घेत आहेत.

### १९५८ मध्यें राष्ट्रपतींनीं ४८ जणांना फांशी माफ केली

१९५८ मध्यें राष्ट्रपतींनीं दया दाखवून ४८ जणांना फांशीच्या शिक्षेचें काळ्या पाण्याच्या शिक्षेमध्यें रूपांतर केलें. दयेसाठी फांशीची शिक्षा झालेल्या २०० कैद्यांचे अर्ज आले होते, त्यांपैकीं ५२ उत्तर प्रदेशांतले, ३५ मद्रासमधले, ३४ पंजाबांतले व १० आंध्रमधले होते. राज्यघटनेच्या ७२ व्या कलमाप्रमाणें राष्ट्रपतींनी माफी देणें, शिक्षा कमी करणें, इत्यादि अधिकार आहेत. दयेसाठीं आलेल्या अर्जांची प्रथम गृहखात्यांत छाननी केली जाते आणि सर्व कागदपत्र मूळ निकालपत्रांसह राष्ट्रपतींच्याकडे धाडले जातात. राष्ट्रपति हे स्वतः कायदातज्ज्ञ असून, ते प्रत्येक प्रकरण तपासूनच आपला निर्णय देतात.

### मुंबई सरकारचा मेडिकल रिसर्च फंड

मुंबई सरकारनें वैद्यकीय संशोधनासाठी एक फंड निर्माण केला आहे व त्यासाठी ३० लक्ष रुपयांचे सरकारी रोखे बाजूस काढून ठेवले आहेत. त्यावरील सुमारें १,२०,००० रुपयांच्या व्याजाचा विनियोग वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य खात्याच्या संशोधन योजनांकडे केला जाईल. त्याकरितां मुंबई सरकारनें 'स्टेट मेडिकल रिसर्च बोर्ड' स्थापन केलें आहे. हें बोर्ड उपलब्ध रकमांची वांटणी करील व त्यासाठी लायक संशोधकांची निवड करील.

### स्टर्लिंग शिलकांतच चढउतार, पण वाढ नाहीं

१९५८-५९ मध्यें भारताच्या स्टर्लिंग शिलकांत चढ-उतार झाला, पण वाढ झाली नाहीं. मार्च, १९५८ अखेर स्टर्लिंग शिलका २६७ कोटी रुपयांच्या होत्या; त्या मार्च १९५९ अखेर २१३ कोटी रुपयांवर उतरल्या. एप्रिल, १९५८ मध्यें त्या एकदां २८४ कोटी रुपयांवर गेल्या होत्या. सर्वांत खालची पातळी ३१ ऑक्टोबर, १९५८ रोजीं गांठली गेली; तेव्हांची शिल्लक १७८ कोटी रु. एवढी होती.

### 'पथेर पांचेली'चा अमेरिकेंत विक्रम

'पथेर पांचेली' हा हिंदी चित्रपट फिफ्थ अॅव्हेन्यू सिनेमांत ३२ आठवडे चालला. त्याची जागा आतां 'अपराजित' हा चित्रपट घेईल. ह्यापूर्वी कोणताहि विदेशी चित्रपट अमेरिकन सिनेमागृहांत इतका दीर्घकाळ चालला नव्हता. एक जर्मन चित्रपट (मूकपट) ३८ वर्षांपूर्वी २२ आठवडे चालला होता; म्हणजे पथेर पांचेलीनें त्याच्या विक्रमावर १० आठवड्यांनीं ताण केली आहे.

### बँक अॅवॉर्ड रद्द केल्याची बँकांना नोटीस

१६ बँकांच्या, कानपूरमधील ३४ कचेऱ्यांतील सुमारें १,१०० बँक नोकरांनीं आपआपल्या बँकांच्या व्यवस्थापकांना नोटीस देऊन बँक अवार्ड रद्द केलें. ह्या बँक अवार्डची मुदत ३१ मार्च, १९५९ अखेर संपली होती. ऑल इंडिआ बँक एम्प्लॉईज असोसिएशनच्या सूचनेप्रमाणें ही नोटीस देण्यांत आली. बँकांच्या व्यवस्थापकांना मतभेद सलोख्यानें मिटवण्याचा सल्ला देण्यांत आला आहे. नोटीस मिळालेल्या बँकांत विदेशी एक्सचेंज बँकाहि आहेत.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.